सावित्री जगदाळे

# दृष्टीतील सृष्टी



# दृष्टीतील सृष्टी

## साविञी जगदाळे

## ई साहित्य प्रतिष्ठान

## या मित्रांनो! घेऊन जा! लुटा! लुटा! लुटून न्या!

# दृष्टीतील सृष्टी

## हे पुस्तक फ़ुकट नाही

यामागे अनेकांचे कष्ट व पैसे आहेत.

पण तरीही आम्ही ते वाचकांना विनामूल्य घेऊ देतो.

कारण ई पुस्तक एकदा बनलं की एकजण वाचो वा एक लाख.

आमचं काहीच कमी होत नाही.

उलट आनंद वाढतो.

मजा येते.

पण

## तुम्ही ते फ़ुकट का घ्यावं?

तुम्हालाही काही देता येईल.

असे काही द्या ज्याने ई साहित्यच्या लेखकांना, टीमला आणि तुम्हालाही आनंद मिळेल

आणि तुमचं काहीच कमी होणार नाही.

तुम्ही आशिर्वाद आणि शुभेच्छा द्या

लेखकांना फ़ोन करून दाद द्या

आपल्या मित्रांचे मेल पत्ते आम्हाला द्या

मित्रांना हे पुस्तक मेल आणि Whatsapp करा

ई साहित्यचे फ़ेसबुक पेज, इन्स्टाग्राम, टेलिग्राम यांवर स्वतः जा व इतरांना आमंत्रित करा. सोशल मिडियावर ई साहित्यचा प्रचार करा.

सर्वात बहुमोल अशा तुमच्या सूचना द्या

दाद म्हणजे स्तुतीच असावी असे नाही. प्रांजळ मत, सूचना, टीका, विरोधी मत यांचे स्वागत आहे. प्रामाणिक मत ज्याने लेखकाला व ईसाहित्य टीमला प्रगती करण्यासाठी दिशा ठरवण्यास मदत होईल. मराठीत अधिक कसदार लेखन व्हावे व त्यातून वाचक अधिकाधिक प्रगल्भ व्हावा. अखेर संपूर्ण समाज एका नव्या प्रबुद्ध उंचीवर जात रहावा.

# दृष्टीतील सृष्टी


## सावित्री जगदाळे

Email:savitrijagdale65@gmail.com

Mobile: 97659 88993



या पुस्तकातील लेखनाचे सर्व हक्क लेखिकेकडे सुरक्षित असून पुस्तकाचे किंवा त्यातील अंशाचे पुनर्मुद्रण वा नाट्य, चित्रपट किंवा इतर रुपांतर करण्यासाठी लेखिकेची परवानगी घेणे आवश्यक आहे. तसे न केल्यास कायदेशीर कारवाई (दंड व तुरुंगवास) होऊ शकते.

This declaration is as per the Copyright Act 1957. Copyright protection in India is available for any literary, dramatic, musical, sound recording and artistic work. The Copyright Act 1957 provides for registration of such works. Although an author’s copyright in a work is recognised even without registration. Infringement of copyright entitles the owner to remedies of injunction, damages and accounts.

# प्रकाशक :ई साहित्य प्रतिष्ठान

www.esahity.com

esahity@gmail.com

eSahity Pratishthan

eleventh floor

eternity

eastern express highway

Thane.

**प्रकाशन :१५ मार्च २०२२**



©esahity Pratishthan®2022

• विनामूल्य वितरणासाठी उपलब्ध.

• आपले वाचून झाल्यावर आपण हे फ़ॉरवर्ड करू शकता.

• हे ई पुस्तक वेबसाईटवर ठेवण्यापुर्वी किंवा वाचनाव्यतिरिक्त कोणताही वापर करण्यापुर्वी ई-साहित्य प्रतिष्ठानची परवानगी घेणे आवश्यक आहे.

# लेखानुक्रम


- आत्मनिर्भरता
- चारिका - वारी- आंतरिक नाते
- जावे त्यांच्या वंशा
- उन्हाळकामे
- *शेती मुळे स्त्रिया होतात आत्मनिर्भर
- शिक्षण की ज्ञान
- देव आणि पर्यावरण
- 'स्वत: विचार करा'
- मातीमाय
- कविता लेखन
- रस्ता रुंदीकरण
- लवण स्तंभ

# आत्मनिर्भरता

मळ्यात आम्ही शेती करायला लागल्यापासून पहिल्यांदाच कांदा लावला. दोन वेळा हरभरा पेरला. एकदा उगवलाच नाही. दुसऱ्यांदा अवकाळी पावसाने गेला. मग तिथे कांदा लावा असं भाऊंनी सागितलं. त्यांच्याच शोतातलं रोप आणलं. बायका लावून कांद्याची रोपं लावली. पंधरा दिवसांनी बारीक बारीक तण उगवले. तेव्हा अनुभवी शेजारीण म्हणाली. " बारीक आहे तोवरच काढून घ्या तण. मी माळयाच्या म्हातारीला पाठवून देते. " म्हातारी आली. तिला पाहूनच वाटलं ही कशी भांगलणार... दात सगळे पडल्यामुळं तोंडात जीभ हलत होती. हातापायांच्या काड्या. तिला काम सांगणंही नको वाटू लागलं. मी तिच्याकडे बघत होते. ती म्हणाली. कुठं भांगलायचं? तिला शेत दाखवले. तिनं पटकन सुरवात केली. कांद्यांच्या रोपांत अलवार बसून जमीन भुसभुशीत केली. बारीक तण काढले. उरकही भरपूर. तरण्या बायका सुद्धा एवढया भरभर काम करणार नाहीत. बुद्धी. स्मरणशक्ती तल्लख. तेवढाच चाणाक्षपणा. ऐंशी तरी वय असावे.

मला प्रश्न पडू लागले. काय खाल्लं असेल हिनं ही एवढी निरोगी तरतरीत कशी?

एकटी राहते. बँकेत ठेव जमा आहे. स्वतःचा दवाखाना स्वतः करते. आधारकार्ड आहे. स्वयंभू. आत्मनिर्भर म्हणजे काय ते तिच्याकडे बघितले की कळत होते. आत्मनिर्भरता येण्यासाठी कष्ट आणि स्वावलंबन तितकेच महत्त्वाचे असते.

गप्पा मारत असताना तिला विचारले. मटण खाता का?

"खाते की. पंधरादिवसात्न आणते. मी फकस्त अंडी मटण खाते. सुकट. सोडं. बोंबील. चिकन असलं काय खात नाय. पावशेर मटण आणते. मी चालत जाते म टण आणायला. दोन टायम पुरतं. हाडं अजिबात देऊ नको म्हणते त्याला. त्याला माहीत झालंय.

रातच्याला बशीभर भात करते. त्यात लसूण कांदा बटाटा चटणी मीठ घालते. झालं जेवाण. " आजी गप्पीष्ट होत्या. जुन्या आठवणी ताज्या करत होत्या. सासुबाईंच्या आठवण सांगत होत्या.

आजी दुसऱ्या दिवशी साडेनऊलाच आल्या. कडा कोरून तण काढलं. पैसे द्यायला लागले तर म्हणाली, 'एवढं कशाला? कमी करा. '

बळेच दिले. पुन्हा भांगलायला यायचं कबूल केलं.

# चारिका - वारी- आंतरिक नाते

गोतम बुद्धांनी संघाला चारीका करण्याचा उपदेश केला. "भिक्खुंनो, बहुजनांच्या हितासाठी ,सुखासाठी लोकांवर अनुकंपा करण्यासाठी आणि देवमनुष्याचे साफल्य, हित, सुख यांसाठी तुम्ही चालत रहा. " (सर्वोत्तम भूमिपुत्र गोतम-आ.ह.साळुंखे) या पुस्तकातील हा उतारा वाचला आणि मला वारीची सुरुवात का झाली असेल याचा थोडासा अंदाज आला. नेहमी वाटायचं , "का सुरू केली असेल तुकारामांच्या मुलाने, नारायणाने ही वारी ?"

आपल्याकडे तीर्थ यात्रा करणे तसे होतेच. पुण्य प्राप्ती व्हावी म्हणून, मोक्ष प्राप्ती व्हावी म्हणून तीर्थ यात्रा करायचे. पण ठराविक काळ किंवा तोच मार्ग असं काही नसतं. वारीला मात्र ठराविक काळ, मार्ग, मुक्काम ठरलेलं असतं. (वारीच व्यवस्थापन जबरदस्त असते. अतिशय शिसतबद्ध , काटेकोर असते.) सगळ्यांनी एकत्र पायी जाणं, असं का असावं असं नेहमी वाटायचं.

आता वाटतं तुकारामांनी हा मनातला विचार नारायणाला तर सांगितला नसेल ??? त्यांची इच्छापूर्ती करण्यासाठी नारायणाने वारी सुरू केली. कारण तुकोबांचे विचार बुद्धासारखेच होते, आहेत. बहुजन हिताय, बहुजन सुखाय या उद्देशाने चारीका करा. चालण्यामुळे लोकांना धर्म सांगता येतो. त्यांचं कल्याण करता येते. म्हणून एका दिशेला एकजणाने जाऊन लोकांच्या कल्यांणासाठी उपदेश करावा. भिक्खुंनी चारिका करावी असं त्यांनी सांगितले. स्वतःही चार दशकांहून अधिक काळ त्यांनी चारिका केली. वारकरी संप्रदायाचे विचार, आचार बघितले तर बुद्धाच्या विचारांचा हा आधुनिक अवतार वाटतो. ठाम मत मांडण्यासाठी माझा तेवढा अभ्यास नाही. इतरांनी लिहिले आहे तेच मांडण्याचा हा प्रयत्न.

विठ्ठल हा बुद्धाचा अवतार आहे असं संतांच्या अनेक अभंगातून रामचंद्र ढेरेंनी वगैरेंनी दाखवले आहे.

बुद्ध धम्म जेव्हा भारताबाहेर घालवून दिला तेव्हा सगळाच्या सगळा जाणे शक्य नसते. काही अंश राहतो, उरतो. सुप्त अवस्थेत, गुप्तपणे कुठेतरी वाढ विस्तार, विकास होत राहतो. उजळ माथ्याने नसेल वावरत पण वेष बदलून धम्म टिकवून ठेवण्याचा प्रयत्न झाला नसेल कशावरून....

चारिका बद्दल वाचल्यावर तर खात्रीच वाटली. लोकांचे कल्याण करायचे असेल तर चालले पाहिजे. हे असे विचार तुकोबा घरात, मुलांजवल बोलत असणार. जिवंतपणी ते साध्य झालं नाही की मागे राहणारे त्या व्यक्तीची इच्छा पूर्ण करण्यासाठी अनेक कष्ट घेतात. तसंच हे वारीचे असावे. असं माझे वैयक्तिक मत आहे..

हाच संदर्भ या पुस्तकात आहे. ते पाहून खूप आनंद झाला.

"बौद्ध चारीका तथागतांच्या किंवा सारीपुत्त वगैरेसारख्या एखाद्या भिक्खुच्या नेतृत्वाखाली निघत असत. या चारिकेत सामील झालेले भिक्खू पायी चालत असत. वाटेत जागोजागी लोक त्यांचे भोजन, निवास वगैरेंची व्यवस्था करत. एखद्या संतदृष्य व्यक्तीच्या नेतृत्वाखाली दिंडी नेमकी या चारिकेच्या स्वरूपाचीच असते. दिंडीत वारकऱ्यांना सन्मानाने भोजन दिले जाते. त्याला कधीही भिक्षा मानले जात नाही. उलट वारकऱ्यांना भोजन देण्यामुळे आपला गौरव वाढतो. अशी भावना असते. " (सर्वोत्तम भूमिपुत्र -गोतम) आ.ह.साळुंखे.

वारकऱ्यांची जातपात पाहिली जात नाही ही बाब येथे मुद्दाम अधोरेखित केली पाहिजे. आधुनिक दिंडी पाहिल्यानंतर बौद्ध चारिकेचे आणि वारीचे साम्य लक्षात येते.

वारकरी माधुकरी घेत. तर बौद्ध भिक्खू पिंडपात घेत. पींडपात देताना जसा देणाराला आनंद देतो, सन्मान देतो तीच भावना वारकऱ्यांना माधुकरी देतानाची असते.

माझे माहेर मेखळी. ता. बारामती लहानपणी नेहमी वारीच्या वेळी आमच्या घरी दिंडी मुक्कामाला उतरायची. तेव्हा चुलते आणि वडील दोघे मिळून मोठं कार्य असल्याप्रमाणे वारकऱ्यांसाठी सगळं करत. घरातले सगळेच लहान थोर अतिशय आनंदाने आगत स्वागत करत.जेवण झाल्यावर भजन कीर्तन असे. त्यातही सहभाग घेतला जात. तेव्हा वडिलांना वारकरी आग्रहाने अभंग म्हणायला लावत. अण्णा शास्त्रीय संगीताच्या ताल ठेका धरायला लावून ताना घेत, आळवित अभंग म्हणत. वारकरी वाहवा म्हणत. (बापूंच्या, आण्णांच्या गळयात तुळशीची माळ होती.) साधे शेतकरी असलेले आण्णा अभंग म्हणतेवेळी वेगळेच भासत.

दिंडी येणं म्हणजे उत्सव असायचा. पहाटे सगळे वारकरी निघून जात. चहा न घेताच. त्यांच्यातील हा व्रतस्थपणा बौद्ध भिक्खू प्रमाणेच वाटतो. वारकरी वय, श्रीमंती, स्त्री पुरुष, जातपात या बाबतीत भेद करत नाहीत. अशीच समानता बौद्ध धर्माचा पाया आहे.

त्याकाळी पिंडपातासाठी येणाऱ्या भिक्खुंचा कोणी तिटकारा करत नव्हतेच. तसेच आताच्या वारकऱ्यांचा कोणी राग करत नाहीत. आजच्या दिंडीत मुंडण केलेले आणि चिवर धारण केलेले भिक्खू बाह्य स्वरूपात दिसले नाही तरी विचार बौद्ध चारिकेसारखेच आहेत. दिंडीचे आणि चारीकेचे आंतरिक नाते यातून स्पष्ट होते.

# जावे त्यांच्या वंशा

गावाकडे घर केलं तेव्हाच घराशेजारी दोन गुंठे जागेत भाजीपाला करायचा असं ठरवलं . यावेळी शेतात मूग पेरला . कडेने पावटा, भेंडी , गवार, दोडका, गोसावळी, कारले यांच्या बिया टोकल्या . वांगी , फ्लॉवर , कोबी, मिरच्या यांची रोपे लावली . शेपू, चाकवत , पालक, मेथी , कोथींबीरच्या बियांची चिमूट चिमूट लावली. सतत पाऊस पडत होता त्यामुळे पाणी द्यायची गरज पडली नाही. मूग चांगला आला . शेंगा काळया पडू लागल्या की तोडायच्या . पहिल्या दिवशी दोन बादल्या भरल्या . वाकून तोडाव्या लागत त्यामुळे कंबर दुखू लागली. तरी घरच्या शेतातला आणि खत , किटकनाशके न वापरता आलेला. त्यामुळे त्याचं समाधान जास्त. नंतर एक दोन दिवसांनी थोड्या निघत राहिल्या . यासाठी गौरी गणपती गावाकडेच बसवायचे ठरवले. त्यामुळे वरचेवर मुगाच्या शेंगा तोडता येतील . गौरी गणपती बसवताना सून , मुलगा आलेले. घरातली सगळी कामे झाल्यावर सुनबाई कुठेतरी फिरून येऊ म्हणाली . खेड्यात शेताशिवाय कुठे जाणार ...

लांबच्या शेतात गेलो. हल्ली जास्त ऊसाचीच शेती केली जाते . आमच्या शेतात उंच वाढलेला ऊस होता. टॅक्टरने नांगरल्या मुळे बांध

राहतच नाही . मग शेतातूनच वाट काढत जावं लागतं. शेजारच्या सोयाबीनच्या शेतातून निघालो. गुडघ्या एवढं पीक त्यात गवतही भरपूर . अनेक ठिकाणी लाल मुंग्यांची वारुळे . साप असण्याची शक्यता . नीट बघूनच चालावे लागते. आम्ही दोघे , सूनबाई, सहा वर्षाचा नातू असे निघालो . मुलगा आदल्या दिवशीच जाऊन आल्यामुळे येणार नाही म्हणाला. त्याला अनुभव आलेला .

थोडे चालणं झाल्यावर ह्यांनी मागे वळून बघण्याच्या नादात वारुळावर पाय पडला . त्यांच्या पॅण्टवर सगळीकडे लाल मुंग्याच . पॅण्ट काढून मुंग्या झटकून मग पुन्हा घातली. थोड्याफार मुंग्या आम्हालाही चावल्या . शौर्य नाचायला लागला. सूनबाई म्हणाली , कशाला आलोय आपण इकडे ? म्हटलं तुलाच हौस फिरायला जायची. माझ्या आणि शौर्यच्या कपड्यांना कुसळे भरपूर लागली. सोयाबीनचे शेत संपल्यावर ऊसाच्या शेतातून जावं लागलं . ऊसाचे काचोळे हाताला कापत होते. हाताने ऊस धरला तरी मागच्या येणाऱ्याच्या अंगावर पडत होता . शौर्य वैतागला.

" अरे , शेतात आलं की स्ट्रॉंग होतं . आजोबा बघ कसे भरभर चालतात . "

" त्यांना सवय झालीय रोज रोज येऊन " शौर्य वैतागून म्हणाला .

ऊसाच्या बाहेर आल्यावर शेजारच्या काकी मुलाला बघून म्हणाल्या , "आमच्या शेतातून वाट होती की. इकडून यायचं नाही का? " त्यांचा मूग काढल्यामुळे शेत मोकळं होतं. शेजारी हिरवंगार आल्याचे भरघोस पीक होते . पुन्हा एक ऊसाचे शेत ओलांडून उंबराच्या झाडाखाली आलो. तिथे कपड्यावरची कुसळे काढली. शौर्यने खाऊ खाल्ला . नुकतीच एका शेतात ऊसाची लागण केलेली . गेल्यावर्षी भुईमूग , हरभरा होता तेव्हा शेत कसं छान वाटत होतं.

आता उंच वाढलेल्या ऊसामुळे जंगलात आल्यासारखे वाटत होते . थोडावेळ थांबून निघालो . येताना मात्र शेजारच्या आल्याच्या , मुगाच्या शेतातून आलो. तरी वर खाली बांध , पावसाने भरपूर तण वाढलेले आणि निसरडी जमीन. सापाची भिती . मुंग्यांची वारूळे चुकवत आलो. रस्त्यावर आल्यावर सुटकेचा निश्वास सोडला. हे दोन तीन दिवसांनी शेतात चक्कर मारतात. त्यांना काही वाटले नाही . पण आम्हाला ट्रेकींग पेक्षा अवघड अनुभव आला. शेतकऱ्यांच्या कष्टाची जाणीव झाली. रोज किती यातना त्यांना सहन कराव्या लागतात. जावे त्यांच्या वंशा तेव्हाच कळते.

# उन्हाळकामे

कोरेगाव कुमठे हे आमचं गाव. गावाकडे गेली होती. सुगी संपली होती. वैशाख वणव्या सारखा पेटून उठला होता. एखादं घर छपराचं, एखादं स्लॅबचं. बाकी सगळी पत्र्याची. जुनी असतील तर उंची कमी. त्यामुळे भट्टीसारखी घरे तापत होती. अशातच उन्हाळी कामाची गडबड सुरू होती बायकांची. बापे कुठेतरी झाडाच्या सावलीला बसायचे, तिथंच लवंडायाचे. बायकांना ही मुभा नव्हतीच. त्या शिजत घरातच बसणार. स्वतः शिजणार, उन्हाळकामाची दळणे दळणार, शिजवणार. मिरच्या निवडायच्या, वर्षाचं तिखट करायचं. हळद कुटून ठेवायची. आता शांपूमुळे शिकेकाईला सुटी दिलीय. हरभरा, तूर, मूग, उडीद, घेवडा, पावटा अशा कितीतरी डाळी करायच्या. उरलेले बियाण्यांसाठी राखेत घालून ठेवायचे. सगळी धान्य वाळवून ठेवायची. यात जड उचलाउचलीच्या कामात पुरुषांची मदत घ्यायची, बस एवढेच.

शेवयाचा शेवगा आल्यावर बरेच हौशी बापे शेवगा दळायला बसायचे. पण याला अपवादच. बाकी सगळा बायकांचा कारभार. आणि त्यांना गुजगोष्टी करायला, उणीदुनी काढायला पुरुषांची लुडबूड नकोच असते. एकमेकींना मदत करत कामे कशी चुटकीसरशी होतात. बायका

एन्जॉय करतात उन्हाळाही ! तोही कामे करत !! बायकांना कुठे सुटी असते. कामात बदल हीच सुटी.

मी सुलाबाईकडे गेली होती. तर त्यांनी मुगाची डाळ दाखवली आणि म्हणाल्या, "नेतीस का तुला सां ्डग्याला?" किलोभर डाळ डब्यात आणि त्यातलीच ने म्हणत होत्या. गरिबितले मोठं मन दिसत होतं. गरिबीतच मनं श्रीमंत, समृद्ध असतात का? असो.

"मी करते की, कशी करायची ते सांगा." मी म्हटलं. त्यांनी मूग दिले आणि मुगाची डाळ कशी करायची ते सांगितले. म्हणाल्या, " मुगाला तेल मिठाचा हात लावून कडक तापवू .घरच्या जात्यावर भरड न्हायतर गिरनित्नं आण भरडून. पॉलीस करून आण. मग भिजत घाल न्हायतर पीठ करून आण. मग त्यात लसूण घाल. तांबडी चटणी घाल. जिरं घालून कर सांडगे. मी येते घालू लागायला. कर! मी केल्यात्यय. तुला ने. हिरव्या मिरचीचे देऊ का तांबड्या चटनीचे?" असे म्हणून त्यांनी एका पिशवीत सांडगे दिलेही. म्हणाल्या, "लोखंडाच्या तव्यात कर. कालवण बघ कसं लागतंय. कांदा कापून घाल. वायच शेंगदाण्याच कूट घाल." मी घरी गेल्यावर केलं लोखंडाच्या कढईत. मस्त झालं सांडग्याच कालवण.

मग मलाही उत्साह आला. आपणही करावं असं वाटू लागलं. मुगाला तेल लावले. उन्हात तापवले. भरडून पॉलीस करून आणले. त्यात

आणखी डाळी घातल्या. दळून न आणता भिजवून वाटली डाळ. मिक्सरवर वाटताना ही वैताग आला. पूर्वी तर पाट्यावर वाटायच्या डाळ बायका. किती काम करायच्या बायका... आताही करतातच. शेतातली कामे करून म्हशी, शेळया राखायची. त्यामुळे माहेराला सुद्धा राहता यायचं नाही. यालाही अपवाद होते.... सैपाक करून धारा काढणे, शेणपाणी करणं... हजार कामं...

सणवार करून त्या निगुतीने उन्हाळकामे करायच्या. गव्हाची घरातच रवा, सोजी काढायची. त्याच्या पाटीवर शेवया, बोटवं करायच्या. ज्वारी सडून भर्डायची. भिजत घालून शिजवायची. त्याच्या भातवड्या घालायच्या. उडीद भरडून, उखळात मुसळाने सडायचे. शुभ्र डाळ करायच्या. पॉलीस केल्यासारखी. त्याचे शुभ्र पापड. छोट्या कणग्या भरायच्या पापड, भातवड्या, सालपापड्यानी. ताज्या कैऱ्यांचे लोणचे, भुईमुगाच्या शेंगा, निखाऱ्यावर भाजलेले पापड, भातवड्या. ...

या सगळ्या आठवणी मनात मृगजळा सारख्या चरके देऊ लागल्या. आणि आपण निदान सांडगे तरी घालयचेच असं ठरवलं. सगळा अट्टाहास करत घातले सांडगे. हे सगळे उपद्व्याप करताना कितीतरी वेळ गेला. मन सतत द्विधा मनस्थितीत. याला वेळ घालवायची गरज आहे का? सगळं विकत मिळतं. एवढ्या वेळात काहीतरी लिहून झालं असतं. कथा,

कविता, लेख. काहीच नाही तर निदान पुस्तक वाचले असते. एकदा मनात तरळून गेले, मी अशा किरकोळ कामात का वेळ घालवू? पण या विचारांची लाज वाटली मला. कुठलेच काम किरकोळ नसते. मला खायला लागते तर मला करायलाच हवे ना???

पूर्वी वर्षभर भाजीपाला उपलब्ध नसे. पावसाळ्यात तर दळणवळण ठप्प असायचे. मुळात शेतकरी भाजीपाला विकतच आणत नसत. जे आपल्या शेतात पिकतं तेच खायचं. पिकलेला भाजीपाला काही प्रक्रिया करून टिकवून ठेवायचा. हरभाऱ्याच्या ओल्या पाल्याची भाजी अप्रतिम लागते. ती वाळवून ठेवायची. तिचा गर्गटा आठवला तरी तोंडाला पाणी सुटतं. सांगली भागात वांग्याच्या फोडी हळद मीठ लावून वाळवून ठेवतात. सिझन नसताना त्यांचं कालवण करतात. कडधान्यांच्या डाळी, उसळी तर आहेतच. त्या डाळींचे सांडगे करतात. नगर भागात यालाच वडे म्हणतात. याची चव वेगळीच असते. करण्याची पद्धतही वेगवेगळी.

खारवडे तळल्यावर कमळसारखे दिसतात. कुरवड्या मला जमतच नाहीत. त्यांचा व्याप खूप आणि चुकण्याची शक्यता जास्त. मी त्या भानगडीत पडत नाही. कारण तळलेले कोणी खात नाही घरात. पापडही भाजून खातात. वानवळ्याच्या बहिणीनं, वहिनीनं दिलेल्या सणावाराला पुरतात. शेवया तर आता कोणच करत नाही. पाटीवर वळायचे नक्षीदार

पाट्या कुठे दिसतही नाहीत. शेवगा आला. त्याला नावे ठेवत ठेवत आता मशीनवरच्या शेवया सगळे खाऊ लागले. त्यातही मागीसारखी व्हरायटी येऊ लागलीय. बटाटा घालून केलेल्या शेवया मागिसारख्याच लागतात. असं काय काय नवं येतं. जुनं मागं पडत जातं. बदल होत राहतात. सगळंच सहज मिळू लागल्यावर बायकांचं उन्हाळ्यात काय होईल? भट्टीसारख्या घरात त्यांना टी. व्ही. बघतच बसावं लागेल...??? की एसी बसवून घेतील विकतचे सांडगे पापड चघळत???

पुरुषांना अशा बदलाचं फारसं काही देणं घेणं नसावं. आवडतं जेवण ताटात आलं की बस. ते कुठून आलंय की घरात केलंय, कसं केलेय, किती त्रास झालाय ... याचा विचारही करत नाहीत. यालाही अपवाद असतात. असो... आताही मी सांडगे घातले की लेख लिहीला याचं माझ्या नवऱ्याला आहे का काही देणं घेणं. जेवण चवदार असलं म्हणजे झालं. बाकी काही कर. .. पाठ दुखतेय म्हटलं तर म्हणतील, तुला कुणी सांगितलं होतं उद्योग करायला. न सांगितलेलं बरं.

आपला आपण उन्हाळा सोसायचा. उन्हाळी कामे करत साजरा करायचा.

कडक उन्हाळ्याचा ही उत्सव केला बायकांनी. दुःखात, त्रासात गारवा शोधू पाहतात या बायका.

# *शेती मुळे स्त्रिया होतात आत्मनिर्भर*

गावाकडे शेतात काम करणाऱ्या स्त्रिया या आत्मनिर्भर असतात. शेतातील जवळ जवळ ऐंशी टक्के कामे स्त्रियाच करतात . पेरणी टॅक्टरने केली तरी काही ठिकाणी हाताने रोपे लावणे , बी टोकणे यासाठी स्त्रियाच लागतात. नंतर खुरपणी, भांगलन आहेच. साधारण एका पिकाला दोन तीन वेळा भांगलन करावेच लागते. त्यातून स्त्रियांना रोजगार उपलब्ध होतो. या कामासाठी शिक्षणाची अट नसते . शिकण्यासाठी एखादा दिवस पुरतो. त्यामुळे तुमची इच्छा असेल आणि तुम्हाला गरज असेल तर कुणीही शेतीत काम करून रोजगार मिळवू शकतो.

भांगलन झाल्यानंतर काढणी , मळणी असते. मळणी यंत्रावर असली तरी मदतीला स्त्रिया लागतात . बरं या कामाची शेतकऱ्याला तातडीची गरज असतेच. सुगीमध्ये अगदी जास्त रोज देऊन बायकांना बोलावले जाते.

शेतीची कामे बारमाही चालतात. त्यामुळे रोजगार सतत उपलब्ध असतो. शेतात काम केल्यामुळे मोकळी ताजी हवा मिळते. आपोआप व्यायाम होत असल्यामुळे आरोग्य चांगले राहते.

कुठे ना कुठे भाजी , तरकारी पिकवली जाते. येताना कुणीही भाजीचा वानवळा देतात. नाहीतर अगदी कमी दरात ताजी भाजी मिळते.

कित्येक बायका शेतात जाताना दोन तीन शेळ्या चरायला नेतात . जिथं भांगलन वगैरे चालू असेल तिथेच बांधावर झुड्पाला शेळ्या बांधायच्या . गळ्यातलं दावं जरा लांब सोडायचे . त्यांचं त्या चरतात. येताना जळण , गवत डोक्यावरून आणतात . शेळीचं औषधी ताजं दूध मिळते . बोकड असेल तर तो विकून बरेच पैसे मिळतात. यासाठी वेगळा वेळ देण्याची गरज नसते. फारसा खर्चही येत नाही. फक्त कष्ट करायची आणि वेळेचे नियोजन करावे लागते . आणि खेडयातील स्त्रिया ते करतात. अशा अनेक उद्योगांमुळे त्यांचं व्यवहार ज्ञानही उत्तम असते . हिशोबालाही पक्क्या असतात . भले लिहिता वाचता न का येईना . समुहाने काम केल्यामुळे त्यांचा मैत्रभाव वाढीस लागतो. एकमेकांना मदत करणे . लग्न कार्याला एकत्र काम करणे , मोठ्यांचा सल्ला मिळणे यासाठी खर्चही कमी किंवा जवळ जवळ नसतोच . कर्जबाजारी होण्याची वेळ येत नाही .

आपल्याच माणसात काम करणामुळे आत्मविश्वास , निर्भयता येते . मानसिक स्वास्थ्य चांगले राहते . त्यामुळे झोपडीतही ती फार दुःखी नसते.

आता बचत गट खेड्यातही असतात. त्यामुळे पैशाचा योग्य विनियोग त्या करू शकतात .

शेतातील सुगीच्या दिवसात मूग , उडीद, चवळी , घेवडा, हरभरा ही कडधान्ये आपल्या शेतात नसतील तर शेजारणी कडून कमी दरात घेऊन त्यांना राख , किटकनाशक पावडर लावून वर्षभराची साठवण करतात . या कडध्यान्याच्या डाळी करून साठवतात. गहू , ज्वारी यांची वर्षभरासाठी साठवण करता येते. सुगी मध्ये धान्य स्वस्त मिळते. खेड्यात भुईमुगाच्या शेंगाही अशाप्रकारे साठवूण ठेवतात .

घरात जर असे वर्षभर पुरेल एवढे धान्य असेल तर ती गृहिणी केवढी तणावमुक्त राहू शकते.

एखादीचा नवरा मुलगा दारुडा , जुगारी असतो तेव्हा तिला त्रास होतो. पण ती एकटी पडत नाही. तिच्या साठी मदतीचे हात सदैव तत्पर असतात. पुरुष कमावता नसला किंवा व्यसनी असला तरी केवळ तिच्यामुळे घरसंसार नीट चालतो. नवरा दारू पिऊन घरात पडला असेल तर ती रात्रीच्या वेळी एकटी पाण्याचं दारं धरायला म्हणते पिकाला पाणी द्यायला जाते . साप वगैरे दिसतात आपण सावध राहयचे . काठी आपटली की निघून जातात . एवढा आत्मविश्वास निर्माण होतो तिच्यात . अपार कष्ट करून ही आनंदात निरोगी आयुष्य जगू शकते . समाधानाचं तेज तिच्या रापलेल्या , सुरकुतलेल्या चेहऱ्यावर विलसत राहते. म्हणून तर शेतकरी स्त्रिया कधी आत्महत्या केल्याचे दिसून येत नाही.

# *शिक्षण की ज्ञान*

अल्बर्ट आइनस्टाईन एकदा रेल्वेने प्रवास करत होता . तिकीट चेकर आल्यावर त्याने त्याला तिकीट मागितले. आइनस्टाईन बराच वेळ तिकट शोधत होता पण सापडत नव्हते . चेकर म्हणाला , 'राहु देत . तुम्हाला कोण नाही मागणार तिकीट. तुम्हाला सगळे ओळखतात .' तेव्हा आइनस्टाइन म्हणाला, 'मला कुठे उतरायचे आहे ते कसं कळणार... ?'

काही तासांपुर्वी कुठे जायचं म्हणून तिकीट काढलेले . तिकीट तर जाऊ देत पण कुठे जायचंय तेही त्याला आठवत नव्हते.

एकदा एका माणसाने आइनस्टाइनला त्याचा फोन नंबर मागितला तर तो डायरीत शोधू लागला . तो माणूस म्हणाला, 'तुम्हाला तुमचाच नंबर माहीत नाही काय?'

आइनस्टाइन म्हणाला , 'डायरीत लिहिण्याची सोय असताना डोक्यात कशाला ठेवू ?'

आइनस्टाइन शाळेतही फार हुशार नव्हता.

तो परिक्षेत उत्तरे पाठ करून किंवा घोकून लिहीत असेल का?

तोत्तोचान हे पुस्तक वाचून बरेच दिवस झाले . फार सविस्तर आठवत नाही.

पण आशय आठवतो. एक जणाने रेल्वेच्या डब्यात शाळा सुरू केली. कसलेही अटी नियम नाहीत. गणवेष , पुस्तके यांचीही नाही. वेळेची आणि वयाचीही नाही. ज्याला जे शिकायचे ते शिका. कधी येऊन बसा. एक मुलगी शाळेत न बसता शाळेभोवती सायकल वरून फक्त चकरा मारायची . शिक्षक कधीही म्हणले नाहीत की , 'शाळेत येऊन बस , अभ्यास कर... उंडग्या सारखी फिरू नकोस . नवऱ्याच्या घरी गेली तर आई बापाचा उद्धार करशील . . .' काही महिन्यांनी स्वतःहून ती शाळेत येऊन अभ्यास करू लागली. पट पट शिकू लागली. तिच्या आातून तिला शिकावंसं वाटलं . मग थोड्या काळातही उत्तम शिक्षण घेतलं जाऊ शकतं . फक्त थांबण्याची तयारी हवी . आपल्याकडे सगळयाच साठी सतत घाई चाललेली असते. कधी एकदा पाल्य शिकतोय आणि नोकरी , छोकरी/ छोकरा मिळवतोय असं झालेलं असतं . पाल्य जरा वेगळं काही करायला गेला की 'वाया गेलं ' असंच समजतात.

प्रत्येक जीव जन्म झाल्यापासून सतत शिकतच असतो. त्याला कुणी शीक नाहीतर तुझं काही खरं नाही . भविष्य अंधारमय होईल . . . असं

सांगतात का? मग मनुष्य जन्मातच हे लचांड मागे का लागतेय. असो हा फार वेगळा विषय आहे.

शिक्षण हे ज्ञान मिळवण्यासाठी असते की परिक्षेत भरपूर मार्कस् मिळवण्यासाठी ... यावर तज्ज्ञांची , विचारवंतांची बरीच चर्चा झालीय. मी काही तज्ज्ञ नाही . पण मला पटलं ते लिहिलं .

मुलं नापास झाली की आत्महत्या करतात . म्हणून परिक्षा घेणं बंद केलं . म्हणून शिक्षकांनी शिकवणंच बंद करायचं? . हा दोष कुणाचा?

शाळेत कमी मार्क मिळवणारी , नापास होणारी मुलं पुढील आयुष्यात यशस्वी झालेली पहाण्यात येतात. उलट बोर्डात येणारी मुलं पुढं त्याचं काय होतं ते गावातल्यांनाही कळत नाही . कुठेतरी वाचलं , आयटी इंजिनियर मुलगा ट्रेकींगला गेला होता. त्याला खिळा कसा ठोकायचा हे कळत नव्हते. शाळेत हे शिकवत नाहीत. घरात मुलाने फक्त अभ्यासू असावं एवढीच अपेक्षा .

म्हणजे शिक्षण वाईट आहे असं नाही म्हणायचं मला . पण त्यासाठी जी पालकांची तंगडेतोड चाललीय ती बघवत नाही. त्यात इंग्लिश मिडीयममुळे तर आणखी कुतरओढ चाललीय . पालकांची तर मानसिक , आर्थिक दोन्हीतही तणाव . सहज शिक्षण का नसते ... लहाणपणी आम्ही लहाणाचे मोठे कसे झालो आणि कसे शिकलो हे आईबापांना सांगताही

येणार नाही . एवढं सहज शिक्षण होतं. जगणं सुकर , सुंदर फुलवणारं . आता नुसती घुसमट होते विद्यार्थ्यांची आणि पालकांची ही . मुलांना चांगलं शिकवून जंबो पगाराची नोकरी लावणं हेच पालकांचं मोठं ध्येय असतं .

मोठ्या शहरातील मुलं खूप यशस्वी झालेली दिसतात खेड्यातल्या लोकांना . पण ते किती एकांगी पणाने शिकतात हे त्यांच्या जवळ गेल्याशिवाय कळत नाही . तांदूळ साळीतून येतो हे त्यांना माहीत असतं का? शेंगदाण्याचे झाड कसे असते हेही माहीत नसते. दूध तर पिशवीतच तयार होतं . हे त्यांचं नॉलेज . याला अपवाद असतात. सजग पालक आपल्या पाल्याला सर्वांगीण शिक्षण , ज्ञान देण्याचा प्रयत्न करतातच . स्वतःचं आणि पाल्याचं जगणं समृध्द , आनंदमय करतात. हे प्रमाण कमी आहे. रेट रेस मध्ये धावणारेच अधिक .

जगाचा पोशिंदा शेतकरी लिहिता वाचता का न येईना पण उत्तम रितीने शेती करतो. पावसाचे अंदाज अचूक सांगतो. त्याने कुठलीही परिक्षा दिली नसताना तो यशस्वी शेतकरी होतो. निसर्गाशी संवाद साधत आपलं जगणं समृद्ध , आरोग्यमय करतो. इथेही अपवाद असतातच. तरी खेड्यातले जगणे नैसर्गिक आणि अनुभवाने समृद्ध असते. एकमेकांना धरून राहण्याची उपजत जाण असते. पैशापेक्षा माणुसकीला जास्त महत्त्व असते. तसं शहरात हे प्रमाण फार कमी वाटते . शहरात सगळं पैशानी विकत घेता येतं

असा समज असल्यामुळे पैशाची हाव अधिक आहे. खेड्यातही आहे . पण एकमेकांचा धाक असतो तिथे.

पुर्वी गुरूकुलात कुठे परिक्षा होती? तिथे ज्ञानार्जन व्हायचे. ज्ञान मिळवणे आणि पाठांतर करून भरपूर गुण मिळवून टॉपर होणं ( काही महिन्यात ते विसरून जाणे) यात फरक आहेच ना? संत ज्ञानदेव , संत तुकाराम कुठल्या विषयात पदवीधर होते ?

पुर्वीच्या लोकांना लिहिण्याची उपलब्धता कमी असल्यामुळे पाठांतराला महत्त्व होते .

नव्वदी पार केलेले माझे आजोबा निमकी औटकी पाढे खाड खाड म्हणायचे . ते लक्षात ठेवणं तेव्हा गरजेचं होतं . सगळं शिकणं मौखिकच असे. आता आकलन , प्रचिती , सातत्य या गोष्टीना महत्त्व राहिलेय का? घोकून घोकून उत्तरे लिहायची. भरपूर मार्कस् मिळवायचे . हेच पालकांचे , शिक्षकांचे आणि पाल्याचे ध्येय असते .

परदेशात कॉलेजला गेल्यावर विद्यार्थी चौफेर वाचन , संशोधन करून , स्वयंअध्ययन करून डिग्री मिळवतात. आपल्याकडे वर्गाला दांडी मारण्यात फुशारकी असते . असो .

सद्य परिस्थितीत (कोरोना साथीत) जीव जगवणे महत्त्वाचे की परिक्षा देणे ...

आता तर गुगल वर हवं तेव्हा हवं तेवढी माहिती मिळते. मग संशोधन करणे , नवनिर्मिती करणे , कलेला वाहून घेणे याऐवजी घोकंपट्टी करण्यात आयुष्याची किती वर्ष घालवायची ? डिग्री मिळाली की नोकरी लागतेच असं नाही. पण या पदवीधराला जगण्यासाठी आवश्यक छोटी छोटी कामे करण्याची ही लाज वाटावी . . . हे शिक्षणाचे महत्त्व!!! वडिलोपार्जित शेती किंवा इतर धंदा करण्याचा ही कमी पणा वाटतो . ग्रॅज्यूएट मुलींना शेतकरी नवरा किंवा छोटा धंदा करणारा नको असतो किंवा शहरातील नोकरी करणाराच हवा असतो .हेच आपलं शिक्षण... परिक्षा देऊन पदव्या मिळवलेलं !!! फक्त नोकरी मिळवण्याची आस असलेलं!!. कलेला , खेळाला , नव्या विचारांना काही स्थान असते का?

हे माझं (कदाचित अडाणीपणाचं ) वैयक्तिक मत आहे . कारण मला माणसाचा जीव , त्याचं जगणं जास्त महत्त्वाचं वाटतं . कुठल्या आईबापाला वाटेल आपल्या मुलाला संसर्ग व्हावा. .. कोरोना झाल्यावरच त्याचे दुष्परिणाम कळतात. तेव्हा याचं गाभीर्य ठेवायलाच हवं . शिक्षण , शिकणं सतत सतत चालू असते.

कोव्हिड १९ संकटामुळे परिक्षा रद्द झाल्या आहेत . त्यामुळे पालकांची अस्वस्थता वाढलीय . म्हणून काही सुचलेलं लिहिलं.

# *देव आणि पर्यावरण*

आतापर्यंतच्या संशोधनाने हेच सिद्ध केले की देव ही मानवाची कल्पना आहे. । निर्मिती आहे . निसर्गातील अनेक शक्तिमान घटकांना त्याने देव मानले. चंद्र, सूर्य, नद्या, पर्वत, वृक्ष, हेच आदिमानवाचे देव होते.

स्त्री आणि पुरुष प्रतिक म्हणून शिवलिंग पुजले जाऊ लागले. गण प्रमुख म्हणून गणपतीची पूजा होऊ लागली. पूर्वी गणपती मातीचा करून त्याची प्राणप्रतिष्ठा केली जात असे. त्याची दुर्वा वाहून पूजा केली जायची. आरती करून मोदकांचा नैवद्य दाखवून पूजा संपन्न व्हायची. हे अगदी पंचवीस तीस वर्षांपूर्वी होते. सगळयांनाच गणपती करता येत नसनारच. मग मळलेली तयार माती कुंभारकडे असायची. तो गणपती करून देऊ लागला. तीच प्रथा पडली असावी. असा गणोबा स्थापन करून पूजा होत असे. इथे पर्यावरणाचा काहीच तसा प्रश्न नाही, नव्हता. पण गणपती सार्वजनिक झाला. मोठमोठ्या मूर्ती तयार होऊ लागल्या. मोठ्या मूर्तींही विसर्जन करण्यात येऊ लागल्या. याही मातीच्या होत्या तोपर्यंत पर्यावरणाचा प्रश्न नव्हता. पी. ओ. पी. (प्लॅस्टर ऑफ पॅरिस) च्या मूर्ती आल्या आणि उत्सवाचं विद्रुपीकरण झाले. कारण या मूर्ती पाण्यात पटकन विरघळत

नाहीत. महिनोन्महिने मोठ्या मूर्ती पाण्यात तशाच. समुद्रात विसर्जन होणाऱ्या मूर्ती ओहोटीच्या वेळी किनाऱ्यावर राहतात. ज्याला भक्तिभावाने पुजले जाते त्याची अशी विटंबना फक्त भारतीयच निर्ढावलेले नजरेने पाहू शकतात. गणपती उत्सवात बाजारपेठेची उलाढाल प्रचंड असते. कुणाच्या पोटावर पाय येऊ नये म्हणून पर्यावरणाची किती हेळसांड करायची, याला काही धरबंधच राहिला नाही.

गणेशोत्सव म्हटले की पोलिसांच्या अंगावर काटा येतो. महिनाभर रजा बंद. कुणी मेले तरी पोलिसांना रजा मिळत नाही. उत्सव साजरे करणाऱ्यांना याचं काही सोयरसुतक नसते. आपल्यातीलच अशा काही लोकांना उत्सवामुळे किती त्रास होतो याचं कुणाला काही देणं घेणं नसतं. आता डिजे मुळे तर लहान तान्ही बाळं , वृद्ध माणसं यांना होणाऱ्या त्रासाची कुणीच फिकीर करत नाही .

माझे पती (रिटायर पोलीस अधीक्षक) विसर्जनाच्या दिवशी बावीस चोवीस तास ड्यूटी करून घरी यायचे तेव्हा त्यांच्या अंगात त्राण नसायचे. अनेक संवेदनशील भागात गणेश उत्सवाच्या वेळी ड्यूटी बजावणे म्हणजे पोलिसांची सत्वपरीक्षा असते. त्यांनी आम्हाला कधीही सार्वजनिक गणपती पाहायला नेले नाही. वेळ नसायचा आणि अशा बेगडी उत्सवाचा

फक्त तिरस्कार मनात भरलेला असतो. देवाच्या नावाखाली किती तरी चुकीच्या गोष्टी नजरेला येतात. या अशा गोष्टींबद्दल मनात फक्त संताप असतो.

आता तर उत्सवाला आलेले स्वरूप पाहून काल्पनिक देवत्व ही निघून जाईल. 'मनी नाही भाव आणि देवा मला पाव ' असं सगळीकडे चाललेय. प्रसाद मिळतो म्हणून आरतीला जायचं.

गणपतीच्या न विरघळणाऱ्या मूर्ती चालतात तर धातूची मूर्ती का चालू नये. पिओपीचा गणपती चालतो तर धातूच्या गणपतीची मूर्ती बसवली तर... प्रदूषणाचा प्रश्न निकालात निघेल !!! अशी चर्चा वाचली. आणि मी विचार केला आपण धातूच्या गणपतीची प्रतिष्ठापना करायची.

भक्तिभावाने गणपतीची प्राणप्रतिष्ठा करायची आणि काही दिवसांनी पाण्यात सोडून द्यायचं, हे काही मनाला पटत नव्हते. घरातले रोजच्या पूजेचे देव जर धातूचे चालतात तर गणपती का नाही. निर्जीव मूर्तीत प्राणाची प्रतिष्ठा करता येते माणसाला तसे मूर्तीतील प्राण काढून विसर्जन ही करता येतेच की. गौरीचे नाही का तेच तेच मुखवटे अनेक वर्ष वापरले जातात.काही ठिकाणी ते धातू चे असतात. गौरीला जर चालू शकते तर गणपतीला का नाही???? धातू मातीतूनच आलेला असतो ना!

सोवळ्यातील गणपती सार्वजनिक झाला तेव्हा या गणपतीने काहीही वाईट केले नाही, कुठला उत्पात घडवला नाही. मग आता धातूची मूर्ती बसवली तर गणपती कशाला वाईट काय करेल.

२००८ साली आम्ही आमच्या घरात धातूची एक फूट उंचीची गणेश मूर्ती स्थापनेसाठी घेतली. त्याच मूर्तीची गेली चौदा वर्ष आम्ही प्राणप्रतिष्ठा करतोय. देवाला भक्तिभाव महत्त्वाचा असतो. निर्मळ भावनेने वाहिलेली पाने ही देव खातो असं गितेत श्रीकृष्णाने म्हटलेय.

"पत्र वा पुष्प जो प्रेमें फळ वा जळ दे मज

ते त्या पवित्र भक्ताचे अर्पिले खाय मी सुखें" अध्याय नववा - विनोबा - गीताई.

अशा अनेक कथा, कहाण्या आहेत. देवाला शुद्ध मनाने केलेले कर्म आवडते, पुजेसमान असते. भक्तिभावाने कशाचीही पूजा देवाला पोहचते. (ही कल्पना मान्य केली आहे माणसाने.) मग गणपती धातूचा आणला तर का चालू नये? मूर्ती पिओपीची चालते.... (मातीची मूर्ती खूप महाग असते. सगळ्यांना नाही परवडत. बाजारात उपलब्ध आहे तोपर्यंत पिओपी ची मूर्ती विकत घेऊन प्राणप्रतिष्ठा होत राहणार.) धातूची का नाही चालत?

काळाबरोबर जरा विचार करून ठरवावे. हा बदल ही आजच्या काळाची गरज आहे. आपल्याकडे देव धर्माच्या बाबतीत काही बदल केला की अशुभ घडेल याची भीती बाळगतात. म्हणून काही बदल करत नाहीत. पिढ्यानपिढ्या तीच प्रथा, परंपरा चालू ठेवायची. बदल हा निसर्गाचा नियम आहे. निसर्ग म्हणजेच देव पण माणसाला मात्र देवाच्या बाबतीत बदल नको असतो. पिओपीची मूर्ती बसवल्यावर जर काही अशुभ घडत नाही तर धातूची मूर्ती बसविल्या वर कसं काय अशुभ घडेल? भक्तिभावाने पूजा केल्यावर सर्वशक्तिमान देव अशुभ काय करेलच कसा? भव्य दिव्य, ब्रम्हांड निर्माता, सृष्टीकर्ता एव्हढा संकुचित कसा काय असू शकतो! एवढा तरी देवावर विश्वास ठेवावा म्हणते मी!!!

मी ठेवला विश्वास. देव या कल्पनेवर जशी श्रद्धा ठेवलीय तसंच देव धातूची मूर्ती बसल्यावर काही वाईट करणार नाही यावरही श्रद्धा ठेवली. देवाला सगळं कळते. तो सगळे पाहतो. त्याला प्रत्येकाचं मन कळते. अशा अनेक भाबड्या श्रद्धा आहेत माझ्या.

आम्ही धातूच्या मूर्तीची प्राणप्रतिष्ठा केली. त्यावर्षी माझ्या पतीला पंधरा वर्षांनी प्रमोशन मिळाले. पोलीस खात्यात प्रमोशन लवकर मिळते कुठे.... असो.

अजूनही तीच मूर्ती आहे. पर्यावरणासाठी एवढं तरी आम्ही करू शकलो, ही बुद्धी बुद्धिदात्या गणरायाने आम्हाला दिली. अशी बुद्धी सर्वांना देव देवो. प्रदूषण रोखण्यासाठी या गोष्टींचा विचार शहाण्यासूर्त्या माणसांनी करावा.यासाठीच हा शब्द प्रपंच.

# 'स्वत: विचार करा'

" उदया नॉनव्हेज आणू नकोस . " सुशीलाबाई आपल्या मुलाला म्हणाल्या . त्या शहरात राहणाऱ्या मुलाकडे आल्या होत्या. यावेळी रविवारीच गोकुळअष्टमी आली होती. रविवारी चिकन वगैरे नॉनव्हेज असते म्हणून त्यांनी सांगितले.

"का ? तू श्रावण पाळला आहेस का ?"

"हो . उदया गोकुळ अष्टमी आहे . तुम्ही नसेलच पाळला! "

' " नाही. मग काय झालं ? "

" नका पाळू. उपास धरू नका , पुजा करू नका . पण निदान गोकुळ अष्टमीला नॉनव्हेज तरी खाऊ नका . " एवढं सांगितलं खरं पण ऐकतील याची खात्री नव्हती .

सगळे छान आहे. मनासारखे आहे. सुंदर, कामसू, नोकरी करणारी सून मिळाली. पण देवा धर्माचं वावडं. मुलाला तर नव्हतेच पटत. आता जोडीदार तशीच म्हटल्यावर झालं. त्यांच्या प्रश्नांना उत्तरे द्यायची आणि स्पष्टीकरणासहित कारणे सांगायची. आपण केलेलं असं कसं वाया गेले..

एवढा संसार उभा केला . देव धर्म नीट पाळले. सणवार , कुलाचार केवढे निगुतीने केले. पोरांचे भले व्हावे, संसाराची भरभराट व्हावी म्हणून करत होतेच. पण देवाचा धाक होता, आहे. अधांतरी जगण्याला तेव्हढाच आधार असतो, ही दृढ श्रद्धा, समजूत तसूभरही कमी झाली नाही. कर्मकांडे कमी केली. पण सृष्टिकर्ता म्हणून त्याचं महत्व कायम आहेच आहे .पण आताची ही पोरं काहीच करेनाशी झालीयेत. याचं सुशिला बाईंना वाईट वाटायचं. जोपर्यंत मुलाचं लग्न झाले नव्हते तोपर्यंत सगळं त्यांच्या मनासारखं एकहाती चाललेलं होतं. कुणी प्रश्न उपस्थित केले नव्हते. पण आता लग्न झाल्यावर त्यांनी जबाबदारी घ्यावी, परंपरा संभाळव्यात असं वाटायचं. खूप उपास तपास, व्रत वैकलये करावीत असे नाही. आपण केले तसं तर मुळीच नको. पण थोडं तरी संस्करापुरते तरी करावं असं त्यांना वाटायचं. त्या काही जुन्या, सनातनी विचारांच्या नव्हत्या. मुलगा सगळं ऐकायचाही. करायला सांगेल तो करायचा. पण आता मात्र लग्न झाल्यापासून त्याचे प्रश्न सुरू झालेत. सून नोकरी करणारी म्हणून त्रास नको. विश्वास नसताना, पटत नसताना करायचं कशाला? या प्रश्नाचं उत्तर सुशिलाबाईंना देता येत नव्हते.

मुलाचं लग्न झाल्यावर, नवीन सून आली. सकाळी लवकर अंघोळ करून ,सुंदर रांगोळी काढली. पूजा केली. खूप बरं वाटलं. पण तिनं देवाला

नैवद्य दाखवलाच नाही. पुजा करताना देवाचं वस्त्र बदलले नाही. तेव्हा डोक्यावर हात मारून घेतला त्यांनी.

माय लेकरांची सतत खडाजंगी चालायची. आता पित्ताचा त्रास होतोय. सतत डोके, पाय दुखतात. चांगल्या डॉक्टरला दाखवायलाच त्या आल्या होत्या. जेवताना त्याला उपासाच थालीपीठ दिलं की तो म्हणाला, "हे खाऊन तू कसला उपास करतेस? त्यापेक्षा वरण भात खाल्लेला बरा नाही का?"

" तसा कसा उपास लागू पडेल? "

" नक्की कशासाठी धरतेस उपास? एकदा क्लिअर कर. हे असं फॅट्स वाढणारे पदार्थ खाल्ल्यावर देव खूश होतो की प्रसन्न?"

"अरे, अशीच परंपरा आहे."

" कुणी पाडली ही परंपरा? हेच अन्न खा असं कुठल्या ग्रंथात आहे. नाही धरला उपास तर देव म्हणतो का तुझं अकल्याण करील!!!"

" अरे जे चाललेय तेच करतेय मी. "

" तब्येत बिघडते तरी? तुला कधी भेटला का देव? की तुझ्या स्वप्नात आला होता देव?"

" इतके दिवस धरले आणि आता सोडायचे म्हणजे नको वाटते. एक दिवस होईल त्रास."

" इतके दिवस उपास करूनही त्रास होतोय तर आता सोडून बघ, त्रास संपून जातात का बघ. प्रयोग कर एकदा. "

" धाडस होत नाही "

" का भितेस? तो आला होता कधी धमकावयाला? मग कशासाठी हे उपास?"

" अरे, एवढा मोठा तो सृष्टीकर्ता त्याचे आपल्याकडे लक्ष राहावे, म्हणून थोडासा त्याग करायचा."

"किती स्वार्थी आणि संकुचित विचार आहेत हे! एवढा मोठा सृष्टिकर्ता त्याच्यासाठी असं चमचमीत थालीपीठ खाऊन उपास करणार आणि आमचं भलं कर म्हणून आज्ञा देणार का त्याला? त्याला एव्हढंच काम आहे का? साधं घर सांभाळताना तुला त्रास होतो. तो तर सगळी सृष्टी सांभाळतो. त्यातून तो असं खिचडी, थालीपीठ खणाऱ्याचेच कसे काय भले करीन? मुकी जनावरे, हवा शुद्ध करणारी झाडे, बाकीचे जीव यांचे तो भले करत नाही का? आतापर्यंत हे जीव टिकून कसे राहिले? ते फार लांबचे झाले. इतर धर्मीय लोक का सुखी, समृद्ध होतात? उपास करत नाहीत तरी? महिन्यातले निम्मे दिवस तुझे हे व्रते, उपास, करून कशी काय प्रगती होणार?

काय भले होणार? त्यापेक्षा काही तरी क्रिएटिव्ह कर. तुझं मन रमेल असं. आपलं काही चुकले असं सतत वाटत राहणार नाही. तुझा आनंद तूच मिळवायचा आहेस. आरोग्य बिघडवून आम्हाला आणि स्वतःला त्रास देतेस एवढं तरी लक्षात घे."

" अरे पण आता उपास सोडून कसं देणार? कुलाचार आहे हा? मी सोडला तरी घरातल्या दुसरं कोणी तरी करायचा असतो."

" गाढवापुढे वाचली गीता..... तू विचार कर. तुला देवाने मेंदू दिलाय तो विचार करण्यासाठी. प्रत्येकाला त्या सृष्टीकर्त्यांने मेंदू दिलाय. तो स्वतः विचार करण्यासाठी. दुसऱ्याचं ऐकण्यासाठी नाही. या सृष्टीतला प्रत्येक जीव स्वतः विचार करून जगतो. कसं जगायचं हे त्याला कुणी सांगत नाही. बुद्धिवान माणसाला मात्र सतत सांगावं लागत. असं करा तसं करा. कळतंय का काय????"

सुशिलाबाईंचे डोळे मिटले. त्यांनी आपली आतली दृष्टी उघडली. मुलगा बोलतोय त्यात बरेच खरे आहे. त्या विचार करू लागल्या. व्रत, पूजा, सणवार हे सगळे का करतो आपण? कुणी तरी सुरू केले असतील. का केले असतील?? आपण का करायचं ??आता याची गरज आहे का? परंपरेनुसार कुलाचाराच्या नावाखाली आपली ऊर्जा, वेळ, पैसा किती वाया घालवायचा? पुस्तक वाचले, अनाथाश्रमात खाऊ, खेळणी दिली तर मन

शांत , आनंदी नाही का होणार? वृद्धाश्रमात वाढदिवस साजरा केला तर आशीर्वाद नाही का मिळणार? मग दगडाच्या मूर्तीला फुले का वाहायची? नैवद्य का दाखवायचा? खरच का करतो आपण हे सगळे????? त्यांच्या अंतर्मनातील प्रश्नांचा एकेक डोळा उघडत होता.

# मातीमाय

आईचं वय नव्वदीच्या पुढे झाले आहे. आता शेतीतील कामे होत नव्हती. गुडघे दुखत होतेच. तरी तिचे माळवे लावायचे वेड कमी होत नव्हते. गवार भेंडी, पावटा, मिरच्या, असं लावायची. माळवं निघायला लागले की सुनेच्या मागे पिरपिर , "तेवढ्या गवारीच्या शेंगा तोडून दे पोरांना."

सुनेने बाकीची कामे सोडून गवारी तोडाव्यात. नाहीतर रोजाच्या बाईला घेऊन माळवं तोडून तालुक्याच्या गावाला पाठवावे. तिथं मुलं शिकायला एक कुटुंब ठेवलेले. शेती करणारा भाऊ म्हणायचा, "होत नाहीतर कशाला अबदा करून घेतीस? त्यांना पावशेर शेंगा विकत घेणं होईना काय..."

रोजाची बाई लावून भाज्या तोडून पाठवणे त्याला पटत नव्हते आणि परवडत ही नव्हते. पण एवढी मोठी शेती आणि पोरांनी विकतच्या भाज्या खायचे हे आईला पटत नव्हते. ती कोंबड्या पाळायची. अंडी लागतात पोरांना म्हणून. स्वतःच्या गळयात तुळशीची माळ असली तरी गावात मटण पडले की घ्यायला लावायची. पाठवून द्यायची तालुक्याला. शहरात

काहीच चांगले मिळत नाही हा तिचा समज. दूधवाला तर एक ठरवूनच टाकलेला. घरचे दूध रोज पोरांकडे पोच व्हायचे.

कोवळी गवार लोखंडी तव्यावर परतलेली पाहून तिला लेकिंची आठवण यायची. चुलीत भाजलेली वांगी पाहून तिचे डोळे भरायचे. भाजलेली, उकडलेली मक्याची कणसं पाहून जीव तीळ तीळ तुटायचा. हे सगळं पोरांना पोच व्हायलाच पाहिजे , लेकींना मिळायला पाहिजे हा तिचा अट्टाहास असायचा.

मातीशी असलेलं नातं तिच्या आरपार रुजलेले आहे. बाई शेतीशी कशी एकरूप, एकजीव होते हे तिच्या वागण्या बोलण्यातून जाणवत राहते. तिला शेतातील कुठल्याही पाटाचे पाणी पवित्र वाटते. तहान लागली की ती ते पाणी पिते. साचलेले असले तरी. " त्याला काय व्हत?" हेच तिचे पालुपद. आणि तिला खरेच पाणी बादले आहे असं झाले नाही. ही तिची अतूट श्रद्धा, वावरशिवाराची एकताणता जाणवत राहते. पायात चप्पल न घालता शेताच्या सरीतून, बांधातून फिरायचे काटा मोडण्याचे भय तिला कधीच वाटले नाही. शेतातून फिरणारे साप तिला राखणदार वाटतात. त्यांचीही भीती कधी वाटली नाही.

आता नुसतीच मोठी पिकं घेतात. जवसाची मूठ, तिळाची मूठ कुणी पेरत नाही म्हणून ती हळहळत असते. तिळाची पेंढी असली की तेवढीच बडवून, पाखडून गाडग्या मडक्यात भरून ठेवायची.

कधीही माहेरी गेली की ती धडधाकट होती तेव्हा रानात कामे करायची, घरी राहायला लागल्यावर सतत काही तरी निवडणे, पाखडणे चालूच असायचे. कुठल्या ना कुठल्या मडक्यात महत्वाचे ठेवलेले काढून द्यायची. ती गाडग्या मडक्यांची उतरंडच आता गायब आहे.

असेच कितीतरी बदल होत राहतील. काळा बरोबर हे होतच राहणार... रानाशिवाराशी एकजीव झालेलं हे जुनं खोड बदल न्याहाळीत राहते. नजर कमकुवत झाली आहे , बहिरेपणा वाढू लागलाय . तेही बरेच आहे.

//////.

# कविता लेखन

दूध हे चांगलेच असते . त्यात पोषणमुल्य असतातच . दूध आटवून जो खवा होतो, तो अधिक पौष्टिक, पचायला जड असतो. मला वाटतं कविता ही खव्या प्रमाणे आहे. कमीत कमी शब्दात मोठा आशय सांगणारी असते.

' नाही निर्मळ जीवन

काय करील साबण '

ह्या तुकाराम महाराजांच्या ओळी किती सोप्या आहेत .. पण जगायला म्हणजे पचायला अवघड आहेत. कविता अशी विचारांचे सार सांगणारी असते . सांगण्यात लय असते. गद्य आणि पद्य यात फरक असतो . आधुनिक कविता गद्य पर वाटतात . जी चांगली कविता असते ती आत कुठेतरी हलवून टाकते. विचारप्रवृत्त करते. त्यातून अनेक अर्थ लागत राहतात. वर्णनात्मक कविता मागे पडलीय . आता आधुनिक कवितांचा काळ आहे . आपल्याला अशा कविता लिहिता येण्यासाठी आधुनिक , उत्तर आधुनिक कवींचे , समकालीन कवींचे कवितासंग्रह वाचणे खूप गरजेचे आहे . आपल्या मनातील भाव, विचार ताकदीने मांडण्यासाठी योग्य

शब्दाची गरज असते. अलंकारिक शब्द वापरायची गरज नसते . थेट , स्पष्ट शब्दात कविता असावी . त्यात आशयगर्भता येण्यासाठी आपल्या शब्द सामर्थ्याची कसोटी लागते . शब्दात सोपेपणा असला तरी अर्थांची खोली असावी लागते. ती येण्यासाठी पारंपारिक लोकसाहित्य , पुर्वसुरींचे साहित्य याबरोबरच आधुनिक काव्य वाचायला हवे. पुर्वीच्या साहित्यिकांनी काय लिहिले आहे अभ्यासण्याची गरज आहेच . तरच आपण वेगळं काही मांडू शकू . दर्जेदार लिहिण्यासाठी तसेच दर्जेदार वाचन आवश्यक आहे

--

मळभ दाटून येणे ही प्रतिमा उदासपणा साठी वापरतात असं समजूया . उदाः

*आले मळभ दाटून
मनी मरगळ फार
गमे उदास भारी
जगणे हा उपचार*

☝ यातून आपली उदासी मरगळ दिसून येते . एका भावासाठी चार ओळी खर्च केल्या . वर्णनात्मकता आहे . मळभ दाटून आले म्हणून उदासी. असं वर्णन आलेय.

- --

*गच्च आभाळ मनाचे

पुरे झाली धावाधाव

देह शिणला अवघा

आता हवा स्थायी ठाव *

--

यात मनाचा मरगळलेला , उदास भाव गच्च आभाळ ही उपमा देऊन उभा केलाय . उदास वाटले की काहीच करावेसे वाटत नाही . उत्साह नसतो . विश्रांती हवी वाटते . ही मनाची अवस्था गच्च भरल्या आभाळाने प्रतीत होते. बाहेर काय आहे माहीत नाही . मनच गच्च आभाळाप्रमाणे झालेय. यात गच्च आभाळाची प्रतिमा वापरून मनाची भावावस्था प्रकट झाली आहे. इथे गच्च आभाळ म्हटले की उदासी , मरगळ हे गृहित धरले आहे. वर्णन नाही . हे आता उदा : म्हणून दिले आहे. ही भावावस्था

प्रत्येकाला कधी ना कधी येतेच . म्हणून अशा कविता आपल्या वाटतात. पुन्हा पुन्हा वाचाव्याशा वाटतात.

-- कविता म्हणजे स्वतःशी संवादच असतो . उत्कट क्षणी तो प्रत्येकाच्या आत सतत , अविरत चालूच असतो. या अव्यक्त, धूसर संवादाला शब्द देणं किंवा शब्दात मांडणं तसं अवघड काम असते. यासाठीच शब्द संपदा समृद्ध असावी लागते. त्यासाठी वाचन आवश्यक असतं.

* धरणीचे आर्जव*

तुझ्यावाचून रे

मी झाले ओसाड

मी माळ उजाड

डोंगराचा

(हुमान ) - अभंगरचना

हा धरणीने पावसाशी साधलेला संवाद आहे. पावसाचं वर्णन नाही यात . पावसाच्या अभावाने तिची अवस्था कशी ओसाड होते असं सांगण्याचा प्रयत्न केला आहे .

///

* वैभव*

नको दूर पळू दुःखा

तुझे वैभव पेलते

सुखचैनीत राहणे

मला कुठे रे जमते

( हुमान काव्यसंग्रह )

/ / /

यात दुःखाशी मनाचा संवाद साधला आहे.

दुःखालाच वैभव मानले आहे. तू दूर पळू नकोस असं मन दुःखाला सांगते. यात दुःखाचे वर्णन नाही . ही प्रतिमा आहे. दुःख म्हणजे काय सगळ्यांना माहीत आहे . त्याचं वर्णन कशासाठी ? मला काय वाटते ते मांडण्याचा हा प्रयत्न आहे .

# रस्ता रुंदीकरण

गावाकडे जाताना वाटेतील मोठमोठ्या झाडांची छाटणी चाललेली असते. उघड्या डोळ्यांनी या हत्या बघाव्या लागतात. फांद्या रस्त्यावर पडणार असतील तर दोन्हीकडचे वाहतूक थांबवून कापाकापी चालते. आता कुठेही जाताना बघा रस्ता रुंदीकरण चालूच असते. झाडे तोडणे आलेच. अशावेळी जोरजोरात ओरडावं वाटतं. पण अशा आक्रोशाची कोण दखल घेणार नाही हेही माहीत असते, नव्हे तेच सत्य असते. आकांत आतल्या आत दडपून टाकावा लागतो. सत्तेपुढे कुणाचं काय चालणार आहे का.... चीपको आंदोलन करणाऱ्या लोकांची आठवण येते. झाडे तोडू नयेत म्हणून ते आदिवासी लोक झाडाला मिठी मारून उभे राहिले, चिकटूनच. झाडे तोडनारे हरले. आता असं मी का करत नाही????

मीटर दोन मीटर व्यासाची खोडे तशीच उभी होती. फक्त फांद्या छाटून टाकलेल्या. हातपाय डोके कापल्यावर माणसांची धडे कशी दिसतील तसं दृश्य दिसत होतं. शंभर दोनशे वर्षाचे जुने वृक्ष तोडून रस्ते रुंद करायचे. मग खड्डे पडले तरी बघायचे नाही. रस्ता रुंद करताना कडेने झाडे लावणे सक्तीचे का करत नाही हे सरकार, कायदा?

जागा जर ताब्यात आली असेल तर नवी झाडे लावायला काहीच हरकत नाही. पावसाळा आहे! हा पावसाळा गेला. एवढी झाडे तोडल्यावर येणारा उन्हाळ्यातील प्रवास कसा असणार आहे, याची कल्पना करवत नाही. मग डोळे उघडणार. मग पुढच्या पावसाळ्यात वृक्षारोपण करणार. दहा वर्षांनी सावली मिळणार. तेही ती झाडे जगली असतील तर. झाडांच्या बाबतीत लोकमानस, सरकार एवढे उदासीन का आहे?

प्रगती साठी माणूस किती नासधूस करतो निसर्गाची... आधी शेतीसाठी जंगले तोडली, शहरे बसवण्यासाठी वने जाळली. माड्या हवेल्या उठवल्या. या माड्या, हवेल्यातल्या चुली पेटवायला पुन्हा वृक्षतोड. झाडे तोडताना काहीही वाटत नाही माणसाला... माणूस इतका स्वार्थी आणि हावरट का झाला असेल? या निसर्गात दुसरा कुठलाच प्राणी एव्हढा कठोर काळजाचा नसावा. दगडाला सुद्धा पाझर फुटतात.

*प्रत्येक जीव गरजेपुरता वापर करतो निसर्गाचा.*

फक्त माणूसच असा आहे, सतत ओरबडत राहतो. आपल्या माणसाला युद्धात मारताना त्याला काहीही वाटत नाहीच. उलट आपल्याला स्वर्ग मिळेल म्हणून दुसऱ्यांना जीवे मारले जाते, स्वतः मरून मग स्वर्गात जायचे.

माणूस हसणारा, बोलणारा आहे. इतर प्राण्यांपेक्षा हाही विशेष माणसाचा

आहे. हे एक सोडले तर नुसते दुर्गुण भरलेत भल्या मोठ्या मेंदूत माणसाच्या. मेंदू छोटाच असता तर बरं झालं असतं. निसर्ग थोडा तरी नीट राहिला असता.

युध्दखोर तर आहेच माणूस. आता तर निसर्गाच्या विनाशाचा विडाच उचलला आहे. किती विध्वंस करायचा यालाही मर्यादा घालून घेतली नाही तर निसर्ग नियमाप्रमाणे माणसाचं काय होईल हे शहाणा सुरता माणूस चांगलं जाणून आहे. ज्या फांदीवर बसलाय तिच फांदी मुळातून तोडायची अशी उरफाटी बुद्धी चालायला लागलीय. पुढच्या दहा वर्षाचा देखील विचार कोण करेना.

हायवेने जाताना तर जीव पिळवटून निघतो. प्रवासच करू नये कुणी... असं वाटत राहतं. शेतकऱ्यांच्या जमिनी ताब्यात घेऊन त्याला उखडून टाकले आहेच. छोट्या छोट्या दुकानदारांची वाट लागली आहेच. या लोकांनी रस्त्यावरच्या कामावर काम करून पोट भरावं या शिवाय काय पर्याय शिल्लक आहे का?

हे पाहून सगळं पाहून जीव तळतळत होता. अशा अस्वस्थ पणात काही ओळी सुचल्या.

## *जेसीपी नावाचा राक्षस*

जेसीपी नावाचा राक्षस
उपसतो मातीचे ढीग
फोडतो माळ टेकड्या डोंगर
तासून काढलेत पर्वत
तोडली जुनी झाडी,
आत सरकली वस्ती गाव वाडी
ओढे, नद्या बुजवत नदीकिनारा नाहीसाच होऊ लागलाय
आटलेल्या नदीवर पूल बांधला
सगळ्याची माती केलीय सपाट
या सपाटीवर बांधतात इमारती उंच
यामुळेच होणारेय महासत्ता भारत
उभारतात फॅकटऱ्या कारखाने
तिथे जाण्यासाठी लांबरुंद, गुळगुळीत रस्ते
या धरतीवर काही दिवसानी फक्त
लांब रस्ते आणि उंच इमारती एवढंच दिसेल की काय..... आणि
एखादी गटाराची काळी रेघ

माझे एक बालिश स्वप्न आहे. पृथ्वीच्या पोटातील इंधन संपून जावे!!!

# *लवण स्तंभ*

आम्ही कुकडी नदिवरचे रांजण खळगे बघून वडगाव दर्या येथे गेलो. हे गाव अहमदनगर जिल्ह्यातील पारनेर तालुक्यात आहे. येथील जगप्रसिद्ध लवण स्तंभ हे प्रेक्षणीय स्थळ आहे. तसेच हे धार्मिक स्थळही आहे.

वडगाव दर्या हे छोटे खेडे आहे. पारनेर पासून वीस किलोमीटर अंतरावर आहे. या गावाला जाताना कान्हुर पठार हे गाव लागते.

कान्हुर पठार हे खूप मोठे पठार आहे, माळरान आहे. हा कमी पावसाचा प्रदेश आहे. सर्व माळरान हे उभट नळी सारखा आकार , पांढुरक्या गुलाबी मोहक रंगाच्या फुलांनी बहरून आलेला आकर्षक दिसते. ही रानफुले पठाराचे सौंदर्य खुलवतात. तसेच पुढे गेल्यावर वडगाव दर्या हे गाव लागते. तिथून अंदाजे एक किलोमीटर खाली खोल दरी आहे. दरीच्या बाजूला डोंगर आहेत. या भागात दुर्मिळ व औषधी वनस्पती आढळतात. वनस्पती शास्त्राचा अभ्यास करणारे विद्यार्थी, अभ्यासक येथे येतात. अनेक प्रकारच्या वनराईमुळे परिसर अतिशय निसर्गरम्य, मनाला लुभवणारा आहे.

लवण स्तंभ, अनेक प्रकारच्या वनस्पती, प्राणी यामुळे प्रवाशांची सतत गर्दी असते.

दर्याबाई, वेल्हाबाई या दोन्ही देवींचे स्थान खाली दरीत आहे. दरीत उतरून जाण्यासाठी पायऱ्या आहेत. जाताना येताना रस्त्यावर माकडे दिसतात. ही माकडे म्हणजेच देवीचे सैन्य आहे अशी लोककथा आहे. आधी मोराचं सैन्य होते. दरीत आल्यावर माकडांचे सैन्य झाले. अशी आख्यायिका आहे. ही माकडे माणसांना कसलाही त्रास देत नाहीत.

कातळ खडकात दोन गुहा आहेत. एक वेल्हाबईची आणि दुसरी दर्याबाईची. गुहेतून आत जाताना कातळ खडक आहेत. वरच्या छताच्या बाजूनेच सतत पाणी ठिबकत असते. ते साठवण्यासाठी खाली टाक्या, हौद बांधलेले आहेत. ठिबकलेले पाणी त्यात साठते. जंगलातील प्राणी, पक्षी यांना प्यायला उपयोगी पडते.

या पाण्यात कॅल्शियम कार्बोनेट आहे. पाण्यातील क्षारांपासून लवण स्तंभ तयार होतात. इथे अधोमुख म्हणजे खाली आणि उधोमुखी म्हणजे वर असे दोन्ही प्रकारचे लवण स्तंभ आहेत. म्हणजे वरून खाली येणारे व खालून वर जाणारे. वरचे पाणी खालच्या पाण्याला खेचते. त्यामुळे

खाली जमिनीवरही वर झेपावणारे उभट लवण स्तंभ तयार होतात. ही लाखो वर्षापासून मंदपणे चालणारी क्रिया अजूनही सतत चालूच आहे.

चुनखडीच्या प्रदेशात गुहा निर्माण होतात. तिथले पाणी क्षारयुक्त असते. अशा सतत ठीबकणाऱ्या पाण्या पासून लवण स्तंभ तयार झालेले आहेत. खडकाला चिकटलेले हे स्तंभ आहेत. एका ठिकाणी गोमुखातून पाणी पडते. हा निसर्गाचा चमत्कार पाहून आम्ही स्तिमित झालो. निसर्गापुढे नतमस्तक झालो.

अशा चमत्कार पुढे माणूस झुकत असतो. निसर्गाला देवत्व देऊन त्याची पूजा करतो. या निसर्गापुढे कोणी मोठं नाही हे कळून चुकते.

गुहेतून मंदिरात गेले की शेजारी परशुरामाचे मंदिर आहे. महादेवाची पिंडी आहे. पुढे दर्याबाईची व वेल्हा बाईची स्वयंभू मूर्ती आहे. हे जागृत स्थान आहे, अशी लोकांची श्रद्धा आहे.

अशा या रम्य, अद्भूत ठिकाणी आम्ही भारावून गेलो. आणि मुलांना वेगळे शास्त्रीय अभ्यासाचं ठिकाण पाहायला मिळाले. मुलं खूश झाली.



**सावित्री जगदाळे यांचे प्रकाशित साहित्य---**

1) एकट पाखरा (कविता संग्रह 2003) राजश्री प्रकाशन पुणे

2) अंकुरात सजला साज (कविता संग्रह 2002 ) राजश्री प्रकाशन पुणे

3) पानमोकळं(कविता संग्रह 2009) सावली प्रकाशन पुणे

4)फुटवा (कथासंग्रह 2007) राजश्री प्रकाशन पुणे

5) तिचं घर ( दीर्घ कथा संग्रह 2009) अजब पब्लिकेशन कोल्हापूर

6)गोष्टीतली बाई ( कथा संग्रह 2009)अजब पब्लिकेशन कोल्हापूर

7) सफर मंगळावरची (कुमार कथा संग्रह 2012 दुसरी आवृत्ती ) लोकसंस्कृती प्रकाशन, नारायणगाव

8) दुधाच्या मिशा (कुमार कादंबरी 2012) दिलीपराज प्रकाशन पुणे कोल्हापूर बालकुमार साहित्य परिषदेचे उत्कृष्ट निर्मिती पुरस्कार

9)गोगलगाईचे पंख (बाल कविता संग्रह 2012 दुसरी आवृत्ती)लोकसंस्कृती प्रकाशन, नारायणगाव

10) सहजतेने जगेन मी ( कादंबरी 2009)अजब पब्लिकेशन कोल्हापूर

11)आजोपिझ्झा- कुमार कादंबरी - ऋग्वेद प्रकाशन आजरा, कविवर्य ए. पा. रेंदाळकर पुरस्कार- २०१८, दुसरी आवृत्ती - २ ० २ ०

12)हुमान - कविता संग्रह २०१९ दिलीपराज प्रकाशन पुणे

१३) चिंचबन - ऋग्वेद प्रकाशन - २०२२

१४ ) जंगलवाट - गाथा कॉग्नीशन - २०२०

१५) स्पायडर मॅन आणि शौर्य - भरारी प्रकाशन - २०२०

*बेधडक महाराष्ट्र या चॅनेल वर ' आपली मुलं आणि आपलं बाल साहित्य ' या विषया वर चर्चा .
*सातारा आकाशवाणीवर कविता आणि बाल कुमार कथा वाचनाचा कार्यक्रम झाला। *पुणे आकाशवाणीवर कथा, बाल कविता वाचनाचा कार्यक्रम झाला।
*फुटवा या कथेस विज्ञान परिषदेचे पारितोषिक।
*अनेक कथांना पारितोषिके। अनेक दिवाळी अंकात कथा, कविता प्रसिध्द।
*मानदेशी तरंगवाहिनीच्या सहयोगाने दहिवडी कॉलेज दहिवडी येथे कविता कार्यशाळेची प्रमुख पाहुणी व कविता कशी सुचते या विषयावर भाषण*
* किशोर मासिक , सकाळ बालमित्र , पुढारी , सामना , दिव्य मराठी, लोकमत, महाराष्ट्र टाइम्स, सकाळ सोलापूर संचार इ. मध्ये लेख, कथा, कविता प्रसिद्ध.
* अक्षर वाङमय , सर्वधारा , कविता रती , मिळून साऱ्या जणी या मासिकातून लेख, कविता प्रसिद्ध .
*निर्मळ रानवारा मध्ये क्रमशः दुधाच्या मिशा, आजो पिझ्झा, जंगलवाट या कुमार कादंबऱ्या प्रशिध्द. चिंचबन ही कुमार कादंबरी ऋग्वेद या कुमार मासिकात कमशः प्रकाशित.
*ललित, मिळून साऱ्याजणी , म.टा. यामध्ये हुमान या काव्य संग्रहाचे समीक्षण प्रसिद्ध.
ज्ञानसागर विद्यालय सातारा येथील विद्यार्थ्यासाठी मोफत कविता कार्यशाळा घेते.
दुधाच्या मिशा -2012) कोल्हापूर बालकुमार साहित्य परिषदेचे उत्कृष्ट निर्मिती पुरस्कार

फुटवा - विज्ञान परिषदेचा पुरस्कार २००२

मित्रहो

पुस्तकं वाचून कोणी शहाणं होतं का?

हो! आम्ही म्हणतो होतं. वाचन करणारी माणसं त्यांच्याबरोबरच्या वाचन न करणाऱ्या माणसांहून अधिक प्रगल्भ आणि विचारी असतात.

कोणत्याही प्राण्याला, सजीवाला, अनुभवाने शहाणपण येतं. काही प्राण्यांना काही प्रमाणात त्यांचे जन्मदाते थोडंफ़ार शिक्षण देतात. पण मानव हा असा प्राणी आहे ज्याला पुर्वी जगलेल्या आणि आता जिवंत नसलेल्या माणसांचे अनुभवही शिकता येतात. ते पुस्तकांद्वारे. माणसाला आपल्या सभोवताली नसलेल्या, दूर देशातल्या माणसांचे अनुभव समजून घेऊन शिकता येतं. तेही पुस्तकांद्वारे. प्रत्यक्ष अनुभवांहून चांगला शिक्षक नाहीच. पण इतरांना आलेले अनुभव, त्यांनी खाल्लेल्या ठेचा याही माणसाला शिकवतात आणि शहाणे करून सोडतात. म्हणून वाचा. वाचत रहा. इतरांना वाचायचा आग्रह करा. वाचाल तर वाचाल हे शंभर टक्के सत्य आहे.

मंडळी!

वाचायला तर हवंच!

www.esahity.com

esahity@gmail.com

**9987737237**